MHLA160007532015

**नियमित फौजदारी खटला क्र.१४/२०१६**
**नारायण वि. पंढरीनाथ व ईतर**

-:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::-

फिर्यादी आणि त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. फिर्यादी आणि आरोपी हे ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांना प्रकरण जलद गतीने चालविण्याचा कायदेशीर व संवैधानिक अधिकार आहे. परंतु सदर प्रकरण १० वर्षे जुने आहे आणि त्यामध्ये कोणतीही प्रगती नाही. त्यामुळे आरोपींना प्रकरणास विलंबाने सामोरे जावे लागत आहे. सदर प्रकरणामध्ये आरोपी क्र.११ यांना समन्सची बजावणी झालेली नाही. त्याचप्रमाणे फिर्यादीने आरोपी क्र.११ यांना समन्स बजावणीकरिता उचित आणि परिणामस्वरुपी कार्यवाही केलेली नाही. आरोपीविरुध्द समन्स काढण्यासाठी फक्त अर्ज दाखल करणे म्हणजे उचित कार्यवाही होणार नाही.

०२. त्याचप्रमाणे आरोपी क्र.४ यांच्याविरुध्द गैरजमानती वॉरंटची बजावणी होत नाही. फिर्यादीने सदर वॉरंटची बजावणी करण्यासाठी उचित कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे सदर वॉरंट विनातामील परत येत आहेत. पोलीस अहवाल (नि.५७) प्रमाणे आरोपी क्र.४ चा शोध घेतला असता मिळून आले नाही. यथास्थितीत फिर्यादीने वॉरंट बजावणीकरिता उचित आणि परिणामस्वरुपी कार्यवाही केलेली नाही. आरोपीविरुध्द फक्त अर्ज दाखल करणे म्हणजे उचित कार्यवाही होणार नाही. सबब फिर्यादी हे जलद गतीने चालवित असल्याचे स्थापित झाले.

०३. मी वारंवार आदेश पारीत करून फिर्यादीला सदर आरोपींविरुध्द

उचित कार्यवाही करण्यास आणि अन्यथा प्रकरण खारीज होईल असे निर्देश दिलेले आहेत. परंतु फिर्यादीने दि.०१/०६/२०२६, ०२/०७/२०२६ आणि आजरोजी आरोपी क्र.४ आणि ११ विरुध्द कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे प्रकरण विनाकारण आणि विनाप्रगती प्रलंबित आहे आणि ईतर आरोपींना विनाकारण प्रलंबित प्रकरणाला विलंबाने सामोरे जावे लागत आहे. त्याद्वारे त्यांच्या संवैधानिक अधिकाराचा भंग होत आहे. फिर्यादीच्या कसुरामुळे आरोपी क्र.४ व ११ यांच्याविरुद्ध प्रकरण प्रकरण खारीज करणे उचित ठरेल, जेणेकरून ईतर आरोपीविरुद्ध प्रकरणाची संपरिक्षा सुरू होईल. सबब मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१) आरोपी क्र.४ व ११ यांच्याविरुध्द फिर्याद कसुरानिशी खारीज करण्यात येते आणि त्यांना भारतीय दंड विधानाचे कलम ४४७, ४६५, ४६७, ४६८ व ४७१ सह कलम ३४च्या गुन्ह्यातून दोषमुक्त करण्यात येते.

२) आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.07.30 17:40:26 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – ३०–०७–२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**देवणी.**